Printed from
महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# समर्थांचे मिशन

6 May 2011, 0323 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

व्यवस्थापनाची दृष्टी- व्हिजन असलेल्या समर्थ रामदासस्वामींचे मिशन काय होते तर सामाजिक पुनर्निर्माण करून समाजाला मार्गदर्शक ठरतील असे महंत अर्थात नेते तयार करणे. आता असा महंत किंवा नेता आजच्या संदर्भात व्यवस्थापक कसा हवा तर त्याला त्याच्या उद्योगातील, व्यवसायातील, संस्थेतील, आस्थापनातील सर्व गुंतागुंतीच्या प्रक्रियांचे ज्ञान असले पाहिजे, म्हणजे उद्भवणाऱ्या प्रश्नांना किंवा येणाऱ्या संकटांना तो तोंड देऊ शकतो. त्याचबरोबर या व्यवस्थापकाच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्वाचे गुणही असावे लागतात. नेतृत्व म्हणजे स्वत:च्या जीवनावर मिळवलेली पकड, सहकाऱ्यांच्या कार्यावर असलेले नियंत्रण, समस्यांवर तोडगा काढण्याची प्रवृत्ती, उपलब्ध वेळेचा चोख उपयोग करीत अनेकानेक कामे यशस्वीपणे हातावेगळी करण्याची हातोटी, जीवनाकडे समग्रतेने पाहण्याची दृष्टी अशा अनेक गुणांचा समुच्चय. अशा नेतृत्वाला स्थल, काल, संधीच्या मर्यादा येत नाहीत म्हणून असे नेतृत्व घडवायचे हे रामदासस्वामींचे मिशन म्हणजे ध्येय होते.

नेतृत्व आणि व्यवस्थापक यांच्यातील ठळक फरक हाच की नेतृत्व हे फक्त काळ, काम, वेगाच्या त्रैराशिकातच विचार न करता, स्वत:च्या चारित्र्याच्या आधारे व्यवस्थापनाच्या अंतिम हिताचे काय आहे याचा निष्पक्षपणे विचार करू शकते. व्यवस्थापकाला नेमून दिलेले काम करवून घेण्याची सवय असल्याने त्याच्याकडे दूरदृष्टीचा अभाव असू शकतो. निर्णयक्षमता असलेले हंस आणि बगळ्यातला सूक्ष्म फरक लिलया जाणणारे, कोणत्याही परिस्थितीची मेख ओळखणारे, माणसांच्या विविध कुवतींचा अभ्यास असणारे, समाजाच्या कलाने नव्या पद्धती रुजवणारे, नेतृत्वाच्या संधीकडे केवळ रोजगाराचे साधन म्हणून न पाहता नेतृत्वाची जीवनशैली अंगी बाणवणारे नेतृत्व रामदासांना अभिप्रेत आहे. एकात्म चरित्र असलेल्या नेतृत्वाच्या अंगी कोणते गुण हवेत हे सांगताना समर्थ सांगतात...

चुकेना ठकेना कामी। प्रसंग जाणता बरा।

यथातथ्य त्वरा जाणे। ज्याचे त्याचे परोपरी।।

कार्य ते नेमितां येना। प्रसंग बहुतांपरी।

म्हणोनी जाणता व्हावा। जाणजाणो वर्तावया।।

उणिव येऊं देना तो। कळहो न करी कदा।

जनाचे मन तो राखे। युक्तीने काम चालवी।।

युक्ती ते सांगता येना। रिझता भिजता कळें।

काळ तो विस्कटी नेदी। भेदिते दीर्घसुचना।

सुचना चाळणा जाणे। बोलिला नित्य नूतनु।

मानता मानता माने। सत्यवादीच नेमकू।

ऐसा तो शहाणा लोकीं। तयाची संगती बरी।

असा नेता विविध बाबतीतली माहिती करून घेऊन प्रत्येक प्रसंगाला त्वरेने सामोरा जातो आणि कोणतीही गफलत न करता यथायोग्य तोडगा काढतो. अशा नेतृत्वाला अनेक प्रकारच्या लोकांना अनेक प्रकारची कामे नेमून द्यावी लागतात, त्यासाठी त्याला स्वत:ला या सर्व गोष्टींचे सखोल ज्ञान असावे लागते. काम यशस्वी होण्यासाठी असा व्यवस्थापक युक्त्या प्रयुक्त्या योजतो, कधी लोकांच्या मनासारखे तर कधी कडक वागतो पण कोणतीही उणीव येणार नाही याची खबरदारी तो घेतो. लोकांशी प्रभावी संवाद कसा साधावा हे तो नेमकेपणाने जाणतो. सत्य संभाषण, नवनवीन दाखले देऊन चतुर व्यवस्थापक लोकांची मने जिंकतो आणि सर्व लोक त्याची संगत मिळावी यासाठी प्रयत्न करतात.

व्यक्तीच्या जीवनाला विशिष्ट ध्येय असले पाहिजे. रामदास सांगतात की, नदीला कालवे बांधून ज्याप्रमाणे सोन्यासारखी पिके घेता येतात तसेच आपले वय (आयुष्य)ही विवेकाविना वाया जाऊ नये म्हणून भानावर येऊन, चुका टाळून चोखपणे लोकव्यवहार करावा. लक्ष्य आणि ध्येय निश्चितीमुळे व्यक्तीच्या सर्व शक्ती एकवटल्या जाऊन अर्तक्य असा पराक्रम गाजवणे शक्य होते. जीवनाचे कप्पे वेगवेगळे असले तरी समोर लक्ष्य मात्र एकच असावे लागते. एक लक्ष्य निश्चित झाल्यावर जीवनाचे

व्यवस्थापन सुकर होते. जीवनाकडे समग्रपणे पाहण्याची ही आधुनिक व्यवस्थापकीय दृष्टी समर्थ रामदासांनीही मांडली आहे.

नरदेहाचे उचित। काही करावे आत्महित।

यथानुशक्त्या चित्तवित्त। सर्वोत्तमी लावावे।

हा रामदासांचा उपदेश सर्वांनाच व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयोगी पडणारा आहे.

- डॉ. सुधीर निरगुडकर

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap
Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768